**MHNG160007022017**

| | | |
|---|---|---|
| प्रकरण दाखल दिनांक | : | २८.०८.२०१७ |
| प्रकरण नोंदणी दिनांक | : | २८.०८.२०१७ |
| निकाल दिनांक | : | १२.०३.२०२६ |
| कालावधी | : | व. म. दि. |
| | | ०८ ०६ १५ |

**भाग–अ**

**मौदा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मौदा**

( पीठासीन अधिकारी एन.के. वानखडे )

**नि.फौ.ख. क्र.१००/२०१७**
**निशाणी क्र.४१.**
[गुन्हा रजि. क्र. ८२ / २०१७.
अरोली पोलीस ठाणे, जि. नागपूर]

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे अधिकारी,<br>अरोली पोलीस ठाणे, ता. मौदा, जि. नागपूर |
| **अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ** | **श्री. एस. जी. इंगळे,** सहा. सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | **१. लक्ष्मीकांत उर्फ शैलेश अशोक लांजेवार,**<br>व.व. २८ वर्ष, धंदा – मजुरी,<br>रा. खात, इंदिरागांधी नगर, ता. मौदा, जि. नागपूर |
| **आरोपींतर्फे विधिज्ञ** | श्री. ए. एस. रेवतकर |

**भाग–ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | १४.०६.२०१७ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | २०.०६.२०१७ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | २८.०८.२०१७ |
| दोषारोप ठेवलेची तारीख | १५.०७.२०१९ |
| पुरावा सुरु झालेची तारीख | १०.०२.२०२० |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय करीता ठेवलेली तारीख | – |
| न्यायनिर्णय तारीख | १२.०३.२०२६. |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | — |

## **आरोपींविषयी माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामिनावर सुटलेची तारीख | आरोपीत गुन्हा | निर्दोष किंवा शिक्षा | ठोठाव ण्यात आलेली शिक्षा | खटल्या दरम्यान आरोपी बंदिवासातअस ल्याचा कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **लक्ष्मीकांत उर्फ शैलेश अशोक लांजेवर** | २०.०६.२०१७ | २१.०६.२०१७ | भा.दं.वि. कलम ३२४ अन्वये. | निर्दोष | — | — |

# **न्या य नि र्ण य**

( घोषित दिनांक १२.०३.२०२६ )

सदरचे प्रकरण आरोपी लक्ष्मीकांत उर्फ शैलेश अशोक लांजेवार याच्याविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४ अन्वये चालविण्यात आले.

## **अभियोग पक्षाची थोडक्यात हकिगत खालील प्रमाणे;**

**२.** दिनांक १४.०६.२०१७ रोजी सकाळी ०७.३० वाजता दरम्यान फिर्यादी सरकारी नळावर पाणी भरण्याकरिता ४ गुंड घेऊन गेली. सदर वेळी आरोपी लक्ष्मीकांत उर्फ शैलेश हा सुध्दा गुंड घेऊन पाणी भरण्यास तेथे गेला. फिर्यादीने तिचे तिन गुंड पाणी भरले व चवथा गुंड पाणी भरण्यास नळावर लावत असता आरोपी तिला म्हणाला की, 'मला पहिले गुंड भरू दे'. त्यावर फिर्यादीने म्हटले की, मी तुझ्या पहिले आली व एकच गुंड पाणी

भरायचा बाकी आहे मला भरू दे नंतर तु भर. त्यावरून आरोपी हा फिर्यादीसोबत भांडण करू लागला व गुंड उचलून फिर्यादीच्या डोक्यावर मारला त्यामुळे फिर्यादीच्या डोक्यातून रक्त निघत होते. करिता फिर्यादीने आरोपीविरूध्द पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

**३.** सदर फिर्यादला अनुसरुन आरोपीविरुध्द मौदा पोलिस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र.८२/२०१७ असा नोंद झाला. गुन्हयाचा तपास ए.एस.आय. शंकरराव तराळे, ब.क्र.६८७, यांचेकडे सोपविण्यात आला. तपासी अंमलदार यांनी संबंधीत साक्षीदारांचे बयान नोंदवुन घेतले, पंचनामा केला व आरोपीविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३ प्रमाणे दोषारोपपत्र सादर केले.

**४.** त्यानंतर माझे पूर्वपिठासीन अधिकरी यांनी निशाणी क्र.१२ प्रमाणे आरोपीविरूध्द भा.दं.वि.कलम ३२४ अन्वये शिक्षापात्र गुन्ह्याकरिता दोषारोप निश्चित केले. आरोपीला दोषारोप त्याचे भाषेत वाचून, समजावून सांगितल्यानंतर आरोपीने गुन्हा नाकबूल केला व प्रकरण गुणदोषावर चालविण्याची तयारी दर्शविली.

**५.** सदर अभिलेखावर असलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपीविरूध्द पुरावा आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ अन्वये जबाब नोंदवण्यात आले. सदर जबाबत त्याने त्याला सदर प्रकरणात खोटे फसविले असल्याचे सांगितले.

**६.** अभियोग पक्षाचे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

**७.** सदर प्रकरणाची हकीकत व इतर अभिलेख इत्यादींचे अवलोकन केल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्या मुद्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नमूद करीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक १४.०६.२०१७ रोजी सकाळी ०७.३० वाजताचे दरम्यान मौजा खात येथे आरोपीने फिर्यादीच्या डोक्यावर गुंड मारून फिर्यादीला इच्छापुर्वक दुखापत पोहचविली व त्याद्वारे त्याने भा.दं.सं.कलम ३२४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| २) | आदेश काय ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली.** |

## <u>का र ण मी मां सा</u>

**८.** सदर प्रकरणी आरोपींविरुध्द नोंद असलेल्या गुन्ह्याच्या सिध्दतेकरिता अभियोग पक्षातर्फे फिर्यादी साक्षीदार क्र.१ – गिता गंगाधर कारेमारे (नि.क्र.१५), घटनास्थळ पंच साक्षीदार क्र.२ – निळकंठ दिवान दिघोरे (नि.क्र.१८), साक्षीदार क्र.३ – बयाबाई बाळकृष्ण खोब्रागडे (नि.क्र.२७) व घटनास्थळ पंच साक्षीदार क्र.४ – अतुल रमेशराव समरित (नि.क्र.२८) यांची साक्ष नोंदविण्यात आली आहे.

### <u>मुद्दा क्र.१ करिता :–</u>

**९.** फिर्यादी सा.क्र.१ गिता गंगाधर कारेमोरे यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की, आरोपी त्यांच्या घराजवळ राहत असल्याने त्या आरोपीला ओळखतात. घटना ही अंदाजे ३ वर्षांपूर्वी सकाळी ०७.०० वाजताचे सुमारास त्यांच्या घराजवळ असलेल्या नळाजवळ घडली होती. त्या नळाचे पाणी भरण्यासाठी चवथा घगरा लावत असता आरोपी तेथे आला. तेव्हा त्यांचा आणखी एक लहान घगरा भरायचा बाकी होता. त्यामुळे त्यांनी आरोपीस थोडे थांबण्यास सांगितले असता आरोपीने त्याचे कडील घगरा त्यांच्या डोक्यावर मारला होता.

त्यामुळे त्यांच्या डोक्यातून रक्त निघाले होते. म्हणून त्यांनी पो.स्टे.ला जावून आरोपीविरूध्द फिर्याद दिली. सदर फिर्याद निशाणी क्र.१६ व प्रथम खबर अहवाल निशाणी क्र.१७ वर असून त्यावर त्यांची सही असल्याचे त्यांनी मान्य केले आहे व त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे कथन केले आहे.

**१०.** फिर्यादी सा.क्र.१ गिता गंगाधर कारेमोरे यांनी बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात सांगितले की, घटनेच्या वेळी त्यांच्या परिसरात एकच नळ होता. पाणी भरताना वाद विवाद होत नसे. नळाला पाणी सकाळी ०७.०० वाजता येवून ०८.०० वाजता जात असे व दिवसातून एकदाच नळाला पाणी येत आहे. त्यांनी हे मान्य केले की, त्यांच्या आजूबाजूचे सर्वच लोक त्या नळावर पाणी भरण्यास येतात, दिवसातून एकादाच नळाला पाणी येत असल्यामुळे लोकांना पाणी पुरेसे मिळत नसे, तो नळ सरकारी होता व त्यांच्या घराच्यासमोरच आहे. तसेच, त्यांनी हे मान्य केले की, त्यांनी प्रकरण आरोपीसोबत न्यायालयाबाहेर आपसात मिटवले आहे. परंतु, त्यांनी नाकारले की, त्या पाणी भरण्यास गेल्या असता त्यांचा पाय घसरून पडल्याने त्यांच्या डोक्याला मार लागला. तसेच, त्यांना माहिती नाही की, आरोपीला आधी वेडेपणाचे झटके येत होते व आरोपी हा मानसिक रोगतज्ञ डॉ. बांडेबुचे, डॉ. व्यवहारे व डॉ. आनंदकुमार यांचेकडे उपचार घेत होता.

**११.** घटनास्थळ पंच सा.क्र.२ निळकंठ दिवान दिघोरे यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की, दिनांक २०.०६.२०१७ रोजी पोलीसांनी त्यांच्या घराजवळ येवून त्यांच्या सह्या घेतल्या होत्या. पोलीसांनी त्यांच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला नसून काहीही जप्त केले नव्हते. घटनास्थळ पंचनामा निशाणी क्र.१९ वर असून त्यातील मजकूर त्यांना माहित नसल्याचे त्यांनी कथन केले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही त्यामुळे अभियोग पक्षाने न्यायालयाची पूर्व परवानगी घेऊन सदर साक्षीदाराला सूचक प्रश्न विचारले. परंतु, तरी देखील अभियोग पक्षास सहाय्य होईल अशी कोणतीही बाब अभिलेखावर आली नाही.

**१२.** सा.क्र.३ बयाबाई बाळकृष्ण खोब्रागडे यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की, त्या आरोपीला व फिर्यादीला ओळखतात. घटना अंदाजे चार ते पाच वर्षांपूर्वी सकाही ०७.०० ते ०७.३० वाजताचे दरम्यान त्यांच्या घराजवळील सरकारी नळाजवळ घडली होती. त्यावेळेस त्या, फिर्यादी व इतर काही बायका नळावर पाणी भरत होते. फिर्यादीचा पाण्याचा गुंड भरत आला होता. तेवढ्यात आरोपी तेथे आला व फिर्यादीला म्हणाला की, त्याला पाणी भरायचे आहे. परंतु फिर्यादीने आरोपीला पाणी भरू दिले नाही व त्यामुळे आरोपी चिडला व त्याने पाण्याचा हंडा फिर्यादीच्या डोक्यावर मारला. त्यामुळे फिर्यादीचे डोके फुटून रक्त निघाले. फिर्यादीची सासु सुध्दा तेथे हजर होती व फिर्यादीच्या सासुने फिर्यादीला सरकारी दवाखाण्यात नेले. घटनेबाबत पोलीसांनी त्यांचे बयाण नोंदविले होते. आरोपीने फिर्यादीला डोक्यावर मारलेला आर्टिकल–अ वरील स्टीलचा हंडा त्यांनी ओळखला.

**१३.** सा.क्र.३ बयाबाई बाळकृष्ण खोब्रागडे यांनी बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात मान्य केले की, गावातील सार्वजनिक नळाच्या आजुबाजुला घरे आहेत, आरोपी पूर्वीपासून त्यांच्या मोहोल्ल्यात राहतो, त्यांचे फिर्यादीसोबत चांगले सबंध असून आरोपी व त्याच्या घरच्यांसोबत बोलचाल बंद आहे, त्यांच्या गावातील सरपंच डहाके असून आरोपीचा जावई रविन्द्र भुतांगेविरूध्द त्यांनी सरपंचाकडे तो दारू विक्री करत असल्यासंबंधी तक्रार केली होती. त्यांनी असेही कथन केले आहे की, गावातील इतर लोकांनी सुध्दा त्या तक्रारीवर सह्या केल्या होत्या. त्यांनी हे मान्य केले आहे की, आरोपीचा जावई आरोपीच्याच घरी राहत होता, त्या आरोपीला लहानपाणापासून ओळखतात, आरोपीला फीट येत होती, आरोपी कधी कधी वेड्यासारखा व कधी शहाण्यासारखा वागतो, आर्टीकल-अ सारख हंडा प्रत्येकाच्या घरी असतो, गावातील सार्वजनिक नळाच्या बाजुला वनिता चचाने व मंदा समरित व इतर लोकांची घरे आहेत. परंतु, आरोपीच्या वडीलांवर पोलीसांनी कार्यवाई केल्याबाबत, आरोपीच्या वडीलांची अवैधरित्या दारू विक्रीच्या प्रकरणातून सुटका झाल्याबाबत, आरोपीचे मनोरूग्ण चिकित्सकाकडे उपचार चालु असल्याबाबत त्यांना माहित नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. पुढे त्यांनी नाकारले की, फिर्यादी सार्वजनिक नळाच्या ठिकाणी घसरून

पडल्यामुळे तिला डोक्याला दुखापत झाली होती. आरोपी व त्याच्या घरच्यांसोबत बोलचाल बंद असल्यामुळे त्या आरोपीविरूध्द खोटी साक्ष देत असल्याचे सुध्दा त्यांनी नाकारले.

**१४.** घटनास्थळ पंच सा.क्र.४ अतुल रमेशराव समरित यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की, ते आरोपी व फिर्यादी यांना ओळखतात. दिनांक २०.०६.२०१८ रोजी पोलीसांनी त्यांना पंचनाम्याकाही बोलविले नव्हते. त्यांच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला नव्हता. घटनास्थळ पंचनामा निशाणी क्र.१९ व नोटीस निशाणी क्र.२९ वर त्यांची सही असून त्यातील मजकूर त्यांना माहित नसल्याचे त्यांनी कथन केले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही त्यामुळे अभियोग पक्षाने न्यायालयाची पूर्व परवानगी घेऊन सदर साक्षीदाराला सूचक प्रश्न विचारले. परंतु, तरी देखील अभियोग पक्षास सहाय्य होईल अशी कोणतीही बाब अभिलेखावर आली नाही.

**१५.** सर्व प्रथम येथे ही बाब नमूद करणे न्यायोचित ठरेल की, अभियोग पक्षाला फिर्यादीने आरोपीवर ठेवलेला गुन्हा कलम ३२४ भा.दं.वि. सिध्द करणेकरिता खालील घटक निसंशयपलीकडे सिध्द करणे गरजेचे आहे.

१. आरोपीने फिर्यादीस दुखापत केली.

२. सदर दुखापत ही पाणी भरण्याचे गुंड च्या सहाय्याने केली.

३. सदर दुखापत ही इच्छापूर्वक केली.

**१६.** आता मी वरील घटक विचारत घेऊन अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे मुल्यांकन करीत आहे. अभियोग पक्षाच्या कथनानुसार आरोपीने फिर्यादीला गुंडाच्या सहाय्याने इच्छापूर्वक दुखापत केली. सा.क्र.१ च्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर साक्षीदाराने तिच्या सरतपासामध्ये आरोपीने तिला गुंड डोक्यावर मारून इच्छापूर्वक दुखापत केल्याचे सांगितले आहे. परंतु, तिने तिच्या उलटतपासामध्ये तिचा न्यायालयाच्या बाहेर आरोपीसोबत आपसी समझौता झाल्याचे मान्य केले आहे.

निशाणी क्र.१४ वरील पुरसिसचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर पुरसिस ही फिर्यादी व आरोपीने संयुक्त दिली असून त्यावर फिर्यादी व आरोपीची सही आहे. तसेच, त्यांचा सदर प्रकरणात आपसी समझौता झाल्याचे दिसून येत आहे.

**१७.** सा.क्र.२ व ४ हे घटनास्थळ पंच असून ते अभियोग पक्षास फितूर झाले आहेत. म्हणून त्यांची साक्ष विचारात घेण्याजोगी नाही. सा.क्र.३ यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केले आहे की, त्यांची व आरोपीची बोलचाल बंद आहे. आरोपीच्या जावईविरूध्द त्यांनी सरपंचाकडे दारू विक्री करत असल्याबाबत तक्रार दिली होती. या बाबीवरून हे लक्षात येते की, आरोपी व सा.क्र.३ यांचात वैमनस्य आहे. म्हणून सदर कारणावरून फक्त सा.क्र.३ च्या साक्षीवर अवलंबून राहून आरोपीने गुन्हा केल्याचे निष्कर्ष काढणे योग्य नाही. सदर साक्षीदाराच्या साक्षेला दुजोरा देणारा दुसरा कुठलाही साक्षीदार अभियोग पक्षाने तपासलेला नाही.

**१८.** अशा परिस्थितीत इथे ही बाब नमूद करणे न्यायोचित ठरेल की, प्रचलित न्यायिक तत्व प्रणालीनुसार आरोपीचे कृत्य शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही अभियोग पक्षाची असते. सदरची जबाबदारी अभियोग पक्षाने बचावातील त्रृटी, विसंगती व खोटेपणाचा आधार न घेता सबळ विश्वासार्ह तोंडी व कागदोपत्री पुराव्याने निसंशयपणे व निर्विवादीतपणे सिध्द करावयाचे असते. अभियोग पक्ष स्वत: ही जबाबदारी पार पाडत नाही तोपर्यंत आरोपी हा कायद्याच्या कक्षेत निष्पाप समजला जातो. आरोपीच्या बचावातील कमकुवतपणाचा फायदा अभियोग पक्षास घेता येणार नाही. जरी आरोपीने आपला बचाव निसंशयरित्या शाबीत केला नाही तरी त्याकारणावरून त्यास शिक्षा देता येणार नाही. आरोपी आपला बचाव अशक्यतेवर दाखवून देऊ शकतो. जर, अभियोग पक्षाच्या खटल्याबाबत संशय निर्माण झाला तर संशयाचा फायदा आरोपीला दिला गेला पाहिजे. तसेच, उपलब्ध पुराव्यावरून दोन परस्पर मत निर्माण होत असतील तर आरोपीच्या बाजूने झुकणारे मत अंगीकारले पाहिजे अशी कायद्याची व्यापक संकल्पना आहे.

**१९.** एकंदरीत अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे कुठेही दिसून येत नाही की, अभियोग पक्षाने निसंशयापलीकडे जाऊन आरोपीवर ठेवलेल्या गुन्ह्याचे घटक सिध्द केले आहेत. घटनास्थळ व जप्ती पंचनामा पंच साक्षीदारामार्फत सिध्द न होणे ही महत्वाची त्रुटी प्रकरणात आहे. म्हणून सदरचे घटनास्थळ हे नेमके कुठे होते हे समजून येत नाही व तसेच, जप्ती पंचनामा सिध्द न झाल्याने आरोपीने आर्टीकल–अ वरील गुंड वापरला किंवा नाही याबाबत सुध्दा विसंगती निर्माण होते. याशिवाय अभियोग पक्षाने इतर कोणतेही साक्षीदार तपासलेले नाही. वरील विवेचनाचा विचार करता आरोपीने फिर्यादीचे डोक्यावर गुंड मारून तिला इच्छापूर्वक दुखापत केल्याचे दिसून येत नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करिता :–</u>**

**२०.** उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने अभियोग पक्षातर्फे आरोपींविरुध्द नोंद असलेला गुन्हा निःसंशयपणे सिध्द झालेला नाही. म्हणून वरील नमूद प्रचलित न्यायिक तत्व प्रणालीनुसार/सिद्धांतानुसार आरोपी संशयाचा फायदा मिळणेस पात्र आहेत. परिणामी, आरोपी सदर गुन्ह्यामधून निर्दोषमुक्त करणे आवश्यक आहे. भौतिक वस्तु G.P.No.142121/27.07.2021,आर्टीकल–अ वरील एक स्टीलचा गुंड जमा असल्याचे दिसून येते. त्यामुळे जप्त मुद्देमाल हा आरोपीने आजरोजी पर्यंत ताबा मागितलेला नसल्याने त्याचा ताबा मूळ मालकाकडे मालकीच्या कागदपत्रांची पडताळणी करून देणे न्यायोचित होईल. सबब, मुद्दा क्र.२ करिता मी खालील आदेश पारित करत आहे.

## <u>आ दे श</u>

१. आरोपी – **लक्ष्मीकांत उर्फ शैलेश अशोक लांजेवार,** याची भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४ या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र व जामीनकतबा रद्द करण्यात येत आहे.

३. अपिल कालावधीनंतर जप्त मुद्देमाल G.P. No.142121 / 27.07.2021, आर्टीकल–अ वरील एक स्टीलच्या गुंडाचा नियमाप्रमाणे ताबा त्याच्या मूळ मालकाकडे कागदपत्र पडताळून देण्यात यावा.

४. आरोपीला असे निर्देशित करण्यात येते की, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये या न्यायालयाचे न्यायनिर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील अथवा अर्ज दाखल झाल्यास त्यांच्यासमोर हजर रहाण्याकरिता सहा महिन्यांच्या कालावधीकरिता त्यांनी प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व तितक्याच रकमेचा जामीन द्यावा.

Sd/–
**( एन.के. वानखडे )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मौदा.

ठिकाण : मौदा.
दिनांक – १२.०३.२०२६.

## भाग–क

## अभियोग/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

(अ) अभियोग पक्षातर्फे साक्षीदार –

| अ.क्र. | साक्षीदारांचे नांव | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | गिता गंगाधर कारेमारे | १५ | फिर्यादी साक्षीदार. |
| २. | निळकंठ दिवान दिघोरे साक्षीदार | १८ | घटनास्थळ पंच |
| ३. | बयाबाई बाळकृष्ण खोब्रागडे | २७ | साक्षीदार |
| ४. | अतुल रमेशराव समरित | २८ | घटनास्थळ पंच |

(ब) बचाव पक्षातर्फे साक्षीदार – निरंक

(क) न्यायालय तर्फे साक्षीदार – निरंक

## अभियोग/बचाव/न्यायालय निशाणी क्रमांक

(अ) अभियोग पक्षातर्फे निशाणी –

| अ. क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १६/सा.क्र.१ | फिर्याद. |
| २. | १७/सा.क्र.१ | प्रथम खबर अहवाल. |
| ३. | १९/सा.क्र.२ | पंचनाम्यास सहीपुरता. |
| ४. | २९/सा.क्र.४ | नोटीसला सहीपुरता. |

(ब) बचाव पक्षातर्फे निशाणी – निरंक

(क) न्यायालय पक्षातर्फे निशाणी – निरंक

(ड) भौतीक वस्तू– G.P.No.142121/27.07.2021, आर्टीकल–अ (एक स्टीलचा गुंड).

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Ku. T. J. Shende |
| Name of Court | Shri. N.K. Wankhade, Judicial Magistrate First Class Mouda. |
| Date of Dictation | 12.03.2026 |
| Judgment Signed by the P.O. on | 12.03.2026 |